# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

# राहुरी - ४१३ ७२२. जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्या शाखा

### माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश माहिती पत्रक

### सन २०२४-२०२५

**ई मेल :adlaempkv2012@gmail. com** **दुरध्वनी क्रमांक : ०२४२६ - २४३२६३**

**वेबसाईट : www.mpkv.ac.in**

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्या शाखा

### विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी

| अ.नं. | पद | फोन |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण | ०२४२६-२४३२०६ |
| २ | कुलसचिव | ०२४२६-२४३२१६ |
| ३ | सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) | ०२४२६-२४३२६३ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | ०२४२६-२४३२१५ |

## १. कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील जिल्हे : पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हे-

अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर

## २. माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम, कालावधी आणि पात्रता

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम | एक वर्ष | उमेदवार इयत्ता ९ वी ची परीक्षा उत्तीर्ण |

## ३. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत माळी प्रशिक्षण केंद्राची यादी

| अ. क्र. | माळी प्रशिक्षण केंद्र | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | कोर्स फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड, विभागीय फळ संशोधन केंद्र , गणेशखिंड, ता.हवेली,जि. पुणे | ११ | ४० | ०२०२५६९३७५० | zars_gkpune@rediffmail.com | रु.१००/- |
| २. | विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, मफुकृवि, राहुरी ता. राहुरी जि.अहमदनगर | १२ | ४० | ०२४२६२४३४४२ | hortfarmnurserympkv@gmail.com | रु .१०००/- |
| ३. | माळी प्रशिक्षण केंद्र,लोणी ता. राहाता, जि. अहमदनगर | १३ | ४० | ८७६६८८०९६६<br>९९७५७६२३४८ | principal.agridairyloni@pravara.in<br>iads@pravara.in | रु.४५००/- |
| ४. | माळी प्रशिक्षण केंद्र,शारदानगर ता. बारामती, जि. पुणे | १४ | ४० | ०२११२२५५५१८<br>९५२७६९३३२० | agripolybaramati@rediffmail.com | रु.२७८०/- |
| ५ | माळी प्रशिक्षण केंद्र, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे | १५ | ४० | ९८६०४९२०७०<br>९७३०८०४७६८ | maliprashikshan@rediffmail.com<br>principalgmkrishi@gmail.com | रु.४५००/- |

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड, पुणे-७/विभाग प्रमुख, केंद्र प्रमुख, माळी प्रशिक्षण केंद्र, उद्यानविद्या विभाग, मफुकृवि, राहुरी/विभाग प्रमुख, केंद्र प्रमुख, माळी प्रशिक्षण केंद्र, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर /केंद्र प्रमुख, माळी प्रशिक्षण केंद्र, शारदानगर, ता. बारामती, जि. पुणे/केंद्र प्रमुख, माळी प्रशिक्षण केंद्र, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे येथे माळी प्रशिक्षण वर्गासाठी सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाकरीता विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा आहे.

**उमेदवारासाठी खालिलप्रमाणे सुचना :-**

१) माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार इ. ९ वी उत्तीर्ण झालेला असावा.

२) प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५.०७.२०२४ पर्यंत आहे.

३) प्रत्येक उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेनुसार संकेतस्थळावर फक्त एकच प्रवेश अर्ज **https://mpkv.diplomaadmission.com** या संकेतस्थळावर ऑन लाईन पध्दतीने भरावा. उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास शेवटचा दाखल केलेला प्रवेश अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

४) प्रवेश अर्जाची प्रत किंवा इतर कोणत्याही कागदपत्रे टपालाने /कुरिअरने किंवा हातबटवडयाने कृषि विद्यापीठ किंवा **ANALYTICA BUSINESS SOLUTIONS** Pune- 411 046 या संस्थेकडे यापैकी कोठेही पाठवू नये.

५) संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.

६) **खुल्या उमेदवारांसाठी रु. ४००/- तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबीट कार्ड किंवा क्रेडीट कार्डव्दारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

७) माळी प्रशिक्षणअभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या उमेदवारांचे वय दिनांक १५.०७.२०२४ रोजी १४ ते ३० वर्षाचे दरम्यान असले पाहिजे प्रवेशाच्यावेळी उमदवाराचे वय ३० वर्षे पुर्ण किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर उमेदवाराला प्रवेश दिला जाणार नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी वयाची अट ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील व उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

८) **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मुळ कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करुन संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

८.१) इयत्ता ९ वी उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक

८.२) शाळा सोडल्याचा मुळ (Original) दाखला तसेच, ज्या उमेदवाराचा इयत्ता १० वी, ११ वी, १२ वी नंतर प्रवेश काही कारणाने शैक्षणिक खंड पडला असेल तर त्या उमेदवारांनी त्यासंबधीचे तहसिलदार यांच्या समोर रु. १००/- स्टॅप पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्रक (Gap Certificate)सादर करावे.

**८.३ विद्यार्थ्यांना १२ टक्के गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र प्रमाणपत्र**

**८.४ तलाठी / पटवारी यांनी सन २०२४ मध्ये दिलेला शेतजमीनीचा ७/१२ चा उतारा/खसरा (गांव नमूना)** उमेदवाराच्या नांवावर किंवा आई /वडील किंवा आजी /आजोबा यांचे नांवे असावा.

८.५ यदाकदाचित आई /वडील हयात नसतील तर सदर उतारा त्यांच्या कुटुंबप्रमुखाच्या नांवावर असावा व या परिस्थितीत कुटुंब प्रमुखाचे **रु. १००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असावे. प्रतिज्ञापत्रकामध्ये सदर उमेदवाराचा उक्त जमीनीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे नमूद करण्यात यावे.**

८.६ सदर उतारा मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत नसेल तर **संबधित राज्यातील राजपत्रित अधिका-याने प्रमाणित केलेले उता-याचे अचूक भाषांतर.**

८.७ उमेदवाराच्या आईचा तिच्या वडीलांकडील शेत जमीनीत वाटा असल्याबाबतचे रु. १००/- च्या मुद्रांकावर तिच्या वडीलांचे प्रतिज्ञापत्र व ७/१२ उतारा अपलोड केल्यास, असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र राहील.

८.८ उमेदवारांस सूचित करण्यात येते की, ७/१२ उता-याच्या आवश्यक तेवढया सत्यप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

८.९ उमेदवाराच्या जमीनीच्या ७/१२ उता-यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या / तिच्या इयत्ता ९ वी च्या गुणपत्रकामध्ये असलेले नांव भिन्न असल्यास अशा उमेदवाराने त्याबाबचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

किंवा

**भूमिहिन शेतमजूर असल्याबाबचे प्रमाणपत्र** : उमेदवाराचे वडील / पालक भूमिहिन शेतमजूर असल्यास भूमिहिन शेतमजूराचे शेतमजूरी करणे हे उपजिविकेचे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे गरजेचे आहे. हे प्रमाणपत्र तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे सही शिक्कयानिशी असावे. सदर प्रमाणपत्र धारक उमेदवार शेतकरी या प्रवर्गासाठी (AG Category) ठेवण्यात आलेल्या आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही. सदर प्रमाणपत्राचा नमूना परीशिष्ट अे येथे देण्यात आलेला आहे.

किंवा

**शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र** : सन २०२४ या वर्षातील तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबचे प्रमाणपत्र , या प्रमाणपत्रात उमेदवार त्याचे आई/वडील अथवा आजी / आजोबा (वडीलांचे आई - वडील) हे जमीनधारक किंवा कूळ असून त्या जमीनीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे. असे नमूद केलेले असावे. सदर प्रमाणपत्राचा नमूना परिशिष्ट बी येथे देण्यात आलेला आहे. अशा प्रमाणपत्र धारकांस शेतकरी प्रवर्ग लागू असेल.

८.१० **जातीचे प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र :**

उपजिल्हाधिकारी/उपविभागीय/तहसीलदार/तालुका दंडाधिकारी यांनी विहीत नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र, विमुक्त जाती- अ, भटक्या जमाती - ब, भटक्या जमाती - क, इतर मागासवर्गीय व विशेष प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक ०१.०४.२०२४ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल त्या दिनांकास ग्राहय असलेले उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र असावे.

**८.११ प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला :** महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी (District Rehabilitation / Resettlement Officer) यांनी उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडिलांची /पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे /पाटबंधारे /वीज /संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली / झालेली आहे असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर **या सवलतीचा फायदा ज्यांना द्यावयाचा आहे, त्याच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

**८.१२** **अपंग असल्याचे प्रमाणपत्र** : अपंग वर्गवारीसाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र. स्वत:ची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याचा दाखला (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल)

**८.१३** **अनाथ प्रमाणपत्र** : आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटरहेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे/ आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.

**८.१४ स्कॅन करून अपलोड केलेले मुळ कागदपत्रे वाचणीय असावेत. याची खातरजमा करूनच मुळ कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली मुळ कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पुर्णत: उमेदवारीची असेल.**

**८.१५ सर्व दृष्टिने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेपर्यंत संकेतस्थळावर भरलेला अर्ज प्रवेशासाठी ग्राहय धरला जाईल.**

**८.१६ खालील पैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रदद समजण्यात येईल.**

**८.१६.१ उमेदवारचे पासपोर्ट आकाराचे सद्याचे छायाचित्र व स्वत:ची स्वाक्षरी संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**८.१६.२ पात्रता परीक्षेचे गुणपत्राची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**८.१६.३ शाळा सोडल्याचा मुळ दाखल्याची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

९. माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेची **कार्यक्रम पत्रिका**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरूवात | २६.०६.२०२४ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | १५.०७.२०२४ |
| ३. | अंतरिम (तात्पुरती) गुणवत्ता यादीची प्रसिद्धी | १९.०७.२०२४ (सायं. ५.३० नंतर) |
| ४. | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा कालावधी | २०.०७.२०२४ ते २२.०७.२०२४ |
| ५. | विचारात घेण्यात आलेल्या तक्रारीच्या यादीची प्रसिद्धी | २४.०७.२०२४ (सायं. ५.३० नंतर) |
| ६. | अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिद्धी | २६.०७.२०२४ (सायं. ५.३० नंतर) |
| ७. | १. **प्रवेश** फेरीच्या वाटप यादीची प्रसिद्धी | २८.०७.२०२४ (सायं. ५.३० नंतर) |
| | २. संबंधित माळी प्रशिक्षण केंद्रामध्ये उपस्थित राहुन प्रवेश घेण्याचा कालावधी | २९.०७.२०२४ ते ३०.०७.२०२४ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ८. | गुणवत्ता यादीनुसार भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशिलाची संकेतस्थळावर प्रसिध्दी | ०५.०८.२०२४ |
| ९. | रिक्त जागेंकरीता 'जागेवर प्रवेश फेरी ' | ०७.०८.२०२४ ते ०८.०८.२०२४ |
| १०. | वर्ग सुरू होण्याचा दिनांक | ०९.०८.२०२४ |

माळी प्रशिक्षण केंद्र, शारदानगर / नारायणगांव यांनी अतिम प्रवेश यादया प्रभारी अधिकारी माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड यांचेकडून तसेच माळी प्रशिक्षण केंद्र, प्रवरानगर, लोणी यांनी प्रभारी अधिकारी, उद्यानविद्या विभाग, म.फु.कृ.वि. राहुरी यांचेकडून प्रमाणित करुन सादर करावयाच्या आहेत.

## ९. आरक्षित जागा

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठातर्गत विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **वर्ग** | **आरक्षित जागांची टक्केवारी** |
|---|---|---|
| १. | अनुसुचित जाती व नवबोध्द | १३ |
| २ | अनुसुचित जमाती | ७ |
| ३ | अ) विमुक्त जाती (अ) (व्ही.जे.ए /डी.टी.ए.) (१४ व तत्सम जाती) | ३ |
| | ब) भटक्या जमाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी.ब) | २.५ |
| | क) भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) (एन.टी.सी) | ३.५ |
| | ड) भटक्या जमाती (ड) ( वंजारी व तत्सम जाती) (एन.टी.डी) | २.० |
| ४ | इतर मागास वर्ग | १९ |
| ५ | EWS | १० |
| ६ | सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) वर्गातील घटकांसाठी * | १० |
| | **एकूण** | **७०** |
| ७ | शेतक-यांचे मुले (अ`.जी.) | ६ |
| ८ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले (एफ.एफ) | २ |
| ९ | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापीत पुनर्वसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापीत व्यक्ती आणि त्याची मुले (पी.ए.पी) | ४ |
| १० | आजी व माजी सैनिकांची मुले (डी.पी) | २ |
| ११ | अपंग (४० टक्के किंवा त्या पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) (पी.एच) | ३ |
| १२ | महिला | ३० |
| १३ | अनाथ | १ |

* वरील आरक्षणामध्ये प्रवेश प्रक्रियेच्या वेळेस प्रचलित शासन निर्णयानुसार बदल संभवतो.

**९.१** अनुक्रमांक ७ ते १२ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आलेला आहे, तसेच क्र. १३ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ट राहील.

**९.२** भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि

सेवा योजना विभाग क्र. टीइएम १०२४/(६३०३)/ताशि-१ दिनांक ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात येतील.

**९.३** पदवी, पदव्युत्तर आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकियेसंदर्भात शासन निर्णय क्र. कृषि व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र.१५५/७अ`, दि.२०.१०.२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जागांच्या रुपांतराच्या कार्यपध्दतीच्या धर्तीवर पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचे रुपांतर करण्यात येईल. सदर शासन निर्णय कृषि विद्यापीठाच्या **mpkvmaliadmission.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**९.४** शासन निर्णय क्रमांक सीबीसी १०/२३००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ५.६.२००६ अन्वये विमुक्त जाती अ, ब भटक्या जमाती क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सहिशिक्यानिशी क्रिमिलिअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा, सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेचे तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

**९.५** इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. ६ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहीत करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चीतपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग परीपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१९८/१६/अ, दिनांक १६.३.१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

**१०. गुणाधिभार**

| **अ.क्र.** | **बाब** | **गुण** |
|---|---|---|
| १. | तलाठी / पटवारी यांनी सन २०२४ मध्ये दिलेला शेतजमीनीचा ७/१२ चा उतारा/खसरा (गाव नमूना) उमेदवाराच्या नांवावर किंवा त्याचे आई / वडील किंवा त्याचे आजी /आजोबा यांच्या नांवे, यदाकदाचित आई वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा. | १२ टक्के |

**स्वाक्षरीत**
**(अरुण आनंदकर)**
**कुलसचिव,**
**मफुकृवि, राहुरी**

**भूमीहीन शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र (नमूना)**

(नायब तहसिलदार अथवा तहसिलदार यांचे सहीचे)

श्री /श्रीमती ------------------------------------------------------------------------------------------- राहणार ------------------------ तालुका ---------------------------------------- जिल्हा --------------------------------------------- भूमीहीन असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ शेतमजूरीवर चालतो. त्यांनी --------------------------- या साली श्री /श्रीमती ------------------------------------------------------------------------------------------- (जमीनधारकाचे नांव) मौजे ------------------- तालुका ---------------------------- जिल्हा ------------------------------ यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम केले आहे.

खाली नमूद केलेला पुरावा तपासल्यानंतर श्री /श्रीमती/कुमार ------------------------------------------------------------------------------- (उमेदवाराचे नांव) हे वरील शेतमजूराचा मुलगा /मुलगी /पत्नी आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे.

पुरावा : १. ----------------------------------

२. ----------------------------------

ठिकाण : सही :

दिनांक : हुद्दा :

टिप : १. जे उमेदवार भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील आहेत असा दावा करतात व ज्यांचे कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न शेतमजूरीवरच आहे, अशांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२. हे प्रमाणपत्र उमेदवाराच्या किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने असल्यास अधिभार देण्याच्या दृष्टीने ग्राह्य धरले जाणार नाही.

३. ज्याची जरुरी नाही ते खोडावे.

४. ह्या प्रमाणपत्रात संबंधीत शेतमजूर ज्या जमीनधारकाच्या शेतावर काम करतात त्या जमीनधारकाचे संपूर्ण नांव इत्यादी सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा यासंबंधी अधिभार देता येणार नाही.

**शेतकरी असल्याचा दाखला**

(तहसिलदार अथवा नायब तहसिलदार यांचे सहीचा)

दाखला देण्यात येतो की, श्री /कुमार / श्रीमती ------------------------------------------------------------ (अर्जदाराचे नांव) यांचे श्री /श्रीमती ------------------------------------------------------------------ आई /वडील /आजोबा /आजी (पितृकुलाकडील) (जमीनधारक) राहणार ------------------------------------------ तालुका ----------------- जिल्हा ---------------------------- हे जमीनमालक या नात्याने धारण --------------- हेक्टर ----------------- आर ---------------------- इतकी जमीन धारण करतात आणि त्याने किंवा तिने धारण केलेली जमीन -------------------------------- कायदा -------------------------------- प्रमाणे मर्यादित आहे.

असेही प्रमाणित करण्यात येते की, ते /त्या स्वत: शेती करीत असून त्यांचे शेती उत्पन्न हे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे.

ठिकाण : सही :-----------------------

दिनांक : नांव :-----------------------

हुद्दा :-----------------------

**वैद्यकीय दाखला**

(सक्षम नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याने जारी केलेला)

(प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल)

मी प्रमाणित करतो की, कुमार /कुमारी ---------------------------------------------------------- याची /हिची संपूर्ण वैद्यकीय तपासणी केली आहे व त्यावरुन खालीलप्रमाणे दाखला देत आहे.

त्याला / तिला काहीही दृष्टीदोष नाही.

त्याला / तिला श्रवणशक्तीचा कुठलाही त्रास नाही.

त्याला / तिला कुठलाही आजार नाही, शारीरिक व्यंग किंवा मानसिक वैगुण्य नाही. जेणेकरुन सध्या किंवा भविष्यात तो / ती दैनंदिन कामकाज किंवा अध्ययनास (शेतावरील किंवा प्रयोगशाळेतील कामास) अपात्र ठरेल.

(विद्यार्थ्याची सही) नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याची सही

ठिकाण : नांव

: --------------------

दिनांक : नोंदणी क्रमांक :---------------------

टिप : १. वैद्यकीय प्रमाणपत्र वरील विहित नमुन्यातच सादर करावे.

२. वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवेत असल्यास दाखल्यावर कार्यालयाचे सील असणे आवश्यक आहे.